यश मिळवण्यासाठी कधीही शॉर्टकट नसतो,कठोर मेहनतच त्याचा मार्ग असतो.

दैनिक
लोकक्रांतीचा आरंभ
# लोकआरंभ

dainiklokaarambh@gmail.com
LOK AARAMBH
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | सोमवार ७ एप्रिल २०२५ | अंक ११६ | पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु




# एकनाथ शिंदे हेच जनतेच्या मनातील मुख्यमंत्री

## शिवसेना खासदाराचं मोठं वक्तव्य




### राणेंची प्रतिक्रिया

दरम्यान त्यानंतर आता धैर्यशील माने यांच्या या वक्तव्यावर भाजप नेते नारायण राणे यांनी प्रतिक्रिया दिली आहे. तुम्ही आग लावायचं काम करत आहात. आज चांगल्या दिवशी मी उत्तर देणार नाही. आताचे जे राजकारणी आहेत, त्यातील मी जुना आहे. एकनाथ शिंदे हे पन्नास वर्षांपेक्षा अधिक काळापासून राजकारणात आहेत. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री , मंत्री राहिले आहेत. बर वाईट कळत ना ? कशाला दोघात लावतायेत. सांगा ना नांदा सौख्य भरे, तर बर होईल, असं राणे यांनी म्हटलं आहे.

### नेमकं काय म्हणाले धैर्यशील माने?

शिवसेना शिंदे गटाचे खासदार धैर्यशील माने यांनी मोठं वक्तव्य केलं आहे. या वक्तव्यानंतर चर्चेला उधाण आलं आहे. प्रशासकीय पातळीवर एकनाथ शिंदे हे जरी उपमुख्यमंत्री असले तरी जनतेच्या मनातील मुख्यमंत्री हे शिंदे साहेबच आहेत असं धैर्यशील माने यांनी म्हटलं आहे. पुढे बोलताना ते म्हणाले की, विधानसभा निवडणुकीत आम्ही या मतदारसंघातील लोकांना आवाहन केलं होतं, तुम्ही आबिटकर याना आमदार करा, त्यांना नामदार आम्ही करतो. मी सांगितलं होतं आबिटकर गुलिगत निवडून येतील आणि विरोधक झापूक झुपूक करतील. एकनाथ शिंदे यांनी आपला शब्द पाळला आहे, आबिटकर हे मंत्री झाले आहेत.

शिवसेना शिंदे गटाचे खासदार धैर्यशील माने यांनी मोठं वक्तव्य केलं आहे. या वक्तव्यानंतर चर्चेला उधाण आलं आहे. प्रशासकीय पातळीवर एकनाथ शिंदे हे जरी उपमुख्यमंत्री असले तरी जनतेच्या मनातील मुख्यमंत्री हे शिंदे साहेबच आहेत असं त्यांनी म्हटलं आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे आभार दौऱ्यासाठी कोल्हापूर दौऱ्यावर असताना धैर्यशील माने यांनी हे वक्तव्य केलं कोल्हापूर जिल्ह्यात दहा पैकी दहा आमदार महायुतीचे निवडून आले आहेत. यातले पाच आपल्या शिवसेनेचे आहेत. आमच्या पक्षाचं वलय वाढतंय, कारण विचाराला मुरड घातलेली नाही, नेतृत्व खंबीर आहे. एकनाथ शिंदे यांच्यासारखं नेतृत्व आम्हाला मिळालं हे आमचे भाग्यच म्हणावं लागेल, असं धैर्यशील माने यांनी म्हटलं आहे. आहे.



## पाटोदा येथे रामजन्मोत्सव उत्साहात साजरा

### जय श्रीराम च्या जयघोषात अवघी पाटोदा नगरी दूमदूमली



पाटोदा ,ता. ६ : मर्यादा पुरूषोत्तम प्रभु रामचंद्राचा जन्मोत्सव म्हणजेच रामनवमी पाटोदा शहरात अत्यंत उत्साहात व भक्तीमय वातावरणात विविध कार्यक्रम घेऊन साजरी करण्यात आली. सकाळी शहरातून काढण्यात आलेल्या मिरवणुकी मध्ये राम भक्तांनी दिलेल्या जय श्री राम च्या घोषणांनी पाटोदा शहर दुमदुमून गेले होते. शहरातील प्रभू श्री राममंदिर या ठिकाणी सकाळ पासुनच भाविकांनी दर्शनासाठी मोठी गर्दी केली होती. सकाळी प्रभू श्री राम मंदिराचे विश्वस्थ चंद्रकांत एकबोटे यांच्या हस्ते अभिषेक व महाआरती करण्यात आली , तर दूपारी ठीक १२. वाजता मुख्य राम जन्मोत्सव साजरा करण्यात आला, यावेळी उपस्थित भाविकांनी म रामनामाचा गजर करीत फूलांची उधळण केली, तत्पूर्वी राम जन्मोत्सवा निमित्त समिति मार्फत ह. भ. प. प्रतिभाताई गायकवाड यांच्या वाणीतून या राम कथेचे आयोजन करण्यात आले होते. रामजन्मोत्सवा नंतर त्यांचे हरीकीर्तन पार पडले. तत्पूर्वी रामजन्मोत्सवानिमीत्त शहरातून भव्य शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले होते , तब्बल साडे सात फुट उंचीची भव्य श्री राममुर्ती मिरवणुकीचे आकर्षण होते,या निमीत्त संपुर्ण शहरातुन रथाम ध्ये ठेवण्यात आलेल्या राममुर्तीची भव्य मिरवणुक काढण्यात आली , या प्रसंगी उत्सव समीतीच्या कार्यकर्त्यांसह रामभक्त नागरीकांची मोठया संखेने उपस्थिती

## दंगलग्रस्त परिस्थिती थांबविण्यासाठी जिजाऊ रथयात्रा-तनपुरे

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट

नांदेड : मराठा सेवा संघाच्या वतीने अठरा मार्च ते एक मे दरम्यान महाराष्ट्रभर मराठा जोडो अभियान हे ब्रीद घेऊन जिजाऊ रथयात्रा फिरणार आहे नांदेड मध्ये ही रथयात्रा शनिवार पाच एप्रिल रोजी दुपारपासुन सात एप्रिल दुपारपर्यंत शहरासह विविध तालुक्यात फिरणार आहे त्या रथयात्रेचे सिडकोत जंगी स्वागत करण्यात आले यावेळी मराठा सेवा संघाचे मार्गदर्शक प्रा.आर्जुन तनपुरे यांनी मनोगत व्यक्त करतांना महाराष्ट्रातील दंगलग्रस्त परिस्थिती थांबविण्यासाठी ही जिजाऊ रथयात्रा आहे असे मत मांडले.

मराठा सेवा संघ महाराष्ट्रातच नव्हे जगभरात जिजाऊ,शिव,शाहु,फुले,आंबेडकर विचार जनमाणसात रूजविण्याचे काम केले आहे प्रबोधनाच्या माध्यमातुन अनेक लेखक,वक्ते,शाहीर, किर्तनकार निर्माण केले मराठा बहुजन समाजाला विविध विषयांवर सभा, कॉर्नर बैठकांच्या माध्यमातुन चर्चा करण्यासाठी आपापसातील संवाद वाढविण्यासाठी ही रथयात्रा



महत्वाची ठरत आहे.अठरा मार्च रोजी शहाजी महाराज जयंती दिवशी भोसले गढी वेरूळ येथुन निघुन एक मे रोजी कामगार दिन व महाराष्ट्र दिनानिमित्त पुणे लालमहल येथे समारोप होणार आहे त्या समारोपाच्या कार्यक्रमास आपण सगळ्यांनी उपस्थित रहावे असेही तनपुरे यांनी सहा एप्रिल रोजी सिडको परिसरात विरशिरोमणी महाराणा प्रताप,माता रमाई आंबेडकर, छत्रपती शिवाजी महाराज पुतळा सिडको, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे पुतळा, राष्ट्रमाता जिजाऊ मॉ साहेब, महात्मा बसवेश्वर या महामानवांना अभिवादन करत हडको छत्रपती शिवाजी महाराज पुतळा येथे झालेल्या कॉर्नर सभेत आपले मत मांडले.मराठा सेवा संघाच्या चळवळीत सिडको नेहमी अग्रेसर राहिलेला आहे.बहुजन बांधव सिडको हडको परिसरात एकत्रितपणे कार्य करतात ही फार मोठी जमेची बाजु आहे.असे मत यावेळी मराठा सेवा संघाचे राष्ट्रीय अध्यक्ष कामाजी पवार यांनी व्यक्त केले.प्रारंभी सुबोध पाटील यांनी सामुहिक जिजाऊ वंदना घेतली प्रास्ताविक संभाजी ब्रिगेड विभागीय अध्यक्ष संकेत पाटील यांनी केले तर आभार उत्तम जाधव यांनी मांडले हरियाणा मराठा सेवा संघाचे मांदीराम चोपडा,संभाजी ब्रिगेड चे प्रदेश कार्याध्यक्ष डॉ गजानन पारधी, संभाजी ब्रिगेड चे प्रदेश संघटक उमाकांत उफाडे,इंजि. शे.रा.पाटील,इंजि.व्ही.टी.शिंदे, इंजि. शिवाजीराजे पाटील, सोपानराव क्षिरसागर,मराठा सेवा संघाचे जिल्हाध्यक्ष पि.के.कदम, जिल्हाध्यक्ष सतीश जाधव, जिजाऊ ब्रिगेडच्या विभागीय कार्याध्यक्षा डॉ विद्या पाटील, जिल्हाध्यक्ष सुमित्रा वडजकर, जिल्हाध्यक्ष कल्पना चव्हाण,मिनाक्षी पाटील, माजी नगरसेविका डॉ करुणा जमदाडे, बालाजी गाडे, संभाजी ब्रिगेड जिल्हाध्यक्ष सुभाष कोल्हे आदिंची यावेळी उपस्थिती होती.मराठा सेवा संघाचे सिडको अध्यक्ष दिलीप कदम,भगवान ताटे,साहेबराव गाढे, जयवंत काळे,त्र्यंबक कदम,दिपक भरकड, एकनाथ पाटील,प्रमोद टेकाळे,उद्धव ढगे,बि.एम.हिवराळे, सुभाष सुर्यवंशी, अनिल हुंबाड,विकास पाटील, संभाजी मस्के, आत्माराम शिंदे, रोहिदास कवाळे, जिजाऊ ब्रिगेड सिडको अध्यक्षा अनुराधा पाटील,कमल हिवराळे,रूक्मिणी सुर्यवंशी,प्रेमला सुर्वशी,वंदना मस्के,संगिता कदम,सविता गाढे सह अनेकांनी कार्यक्रम यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले.

## आज जिल्हास्तरीय लोकशाही दिन

बीड, दि. ६ : जिल्हास्तरावर दर महिन्याच्या पहिल्या सोमवारी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात जिल्हास्तरीय लोकशाही दिन साजरा होतो. माहे एप्रिल २०२५ चा लोकशाही दिन सोम वार दि.७ एप्रिल रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात दु.१ ते २ वा. या वेळेत होणार आहे.

लोकशाही दिनाकरिता नागरिकांनी प्रथम तालुका लोकशाही दिनात अर्ज सादर करणे बंधनकारक आहे. तालुका लोकशाही दिनातील उत्तराने समाधान न झाल्यास जिल्हास्तरीय लोकशाही दिनात अर्जदार अर्ज सादर करु शकतात, असे प्रशासनाने कळिवले आहे.

०००




सिद्धेश्वर महाविद्यालयातील अर्थशास्त्र विभागाचे विद्यार्थी सांगली बँकेला भेट देताना

## महाजन यांनी उगाच आदळ आपट करण्याची काहीच गरज नाही,काय म्हणाले एकनाथ खडसे?





जळगाव : माजी मंत्री एकनाथ खडसे यांनी भाजपाचे संकटमोचक गिरीश महाजन यांच्यावर सनसनाटी आरोप केल्यानंतर दोन्ही नेत्यांमध्ये आरोप प्रत्यारोप सुरु झाले आहेत. गिरीश महाजन यांचे महिला आयएएस अधिकाऱ्याशी संबंध असल्याचा सनसनाटी आरोप एका पत्रकाराच्या हवाल्याने एकनाथ खडसे यांनी केला होता. त्यानंतर भाजपाचे नेते गिरीश महाजन यांनी संतापाने खडसे यांनी पुरावा सादर करावा मी राजकारण सोडून देईन, परंतू खडसे यांच्या बाबत त्यांच्या घरातीलच एक गोष्ट सांगितली तर त्यांना तोंड काळ करुन फिरावे लागेल असा पलटवार गिरीश महाजन यांनी केला आहे. त्यानंतर आता पुन्हा एकनाथ खडसे यांनी गिरीश महाजन यांनी उगाच आदळ आपट करण्याची काहीही गरज नाही असे म्हटले आहे. माजी मंत्री एकनाथ खडसे आणि भाजपाचे नेते गिरीश महाजन यांच्यात विस्तव जात नाही. दोघेही एकमेकांविरोधात सातत्याने टीकात्मक बोलत असतात. गिरीश महाजन यांचे महिला आयएएसशी संबंध असल्याचा आरोप माजी मंत्री एकनाथ खडसे यांनी केला आहे. त्यानंतर भाजपाचे नेते गिरीश महाजन संतप्त झाले आहेत. खडसे यांनी एकही पुरावा दिल्यास मी राजकारण सोडायला तयार आहे असे गिरीश महाजन यांनी म्हटले आहे. तसेच कोणा भोंदू पत्रकाराच्या हवाल्याने एकनाथ खडसे काहीही बोलत आहेत. त्यांच्या बाबतीत त्यांच्या घरातीलच एक गोष्ट मी सांगणार नाही. पण सांगितली तर ते तोंड काळे करुन फिरतील असे गिरीश महाजन यांनी पलटवार करताना म्हटले आहे.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकः राहुल मारोतीराव वाईकर
सोमवार ७ एप्रिल २०२५
https://lokaarambh.com



# संपादकीय

## सर्वगुणसंपन्न प्रभू श्रीरामम

जगभरातील कोट्यवधी हिंदू ंचे आराध्य दैवत असलेल्या प्रभू श्रीरामचंद्रांची जयंती अर्थात श्रीरामनवमी म्हणजे रामभक्तांसाठी आनंदाची पर्वणी असते. जगाच्या पाठीवर रामराज्य हे सर्वार्थाने आदर्श असण्याचे गुपित श्रीरामांमध्ये असलेल्याला अगणित गुणांमध्ये आहे. आज या लेखातून आपण श्रीरामांची काही गुणवैशिष्ट्ये जाणून घेणार आहोत. उपास्य देवतेसंदर्भात उपयुक्त माहिति मिळाल्यावर त्या देवतेप्रती श्रद्धा वाढण्यास साहाय्य होते. आपलीही श्रीरामांप्रतीची श्रद्धा वाढीस लागून श्रीरामाच्या अस्तित्वाचा आपल्या सर्वांना लाभ व्हावा ही श्रीरामप्रभु ंच्या चरणी प्रार्थना ! १. आदर्श राजा : सीतामाता, श्रीलक्ष्मण यांसह श्रीराम वनवासातून अयोध्येत परतल्यानंतर एका परिटाने सीतामातेविषयी संशय व्यक्त केला तेव्हा श्रीरामांनी प्रजेच्या मनात कोणत्याही प्रकारचा संभ्रम नको म्हणून तात्काळ सीतामातेचा त्याग केला. ज्या अर्धांगिनीने श्रीरामांना वनवासात साथ दिली तिचा एका परिटाच्या संशयावरून त्याग करताना श्रीरामांनी एका राजासाठी प्रजा किती महत्वाची असते हे स्वतःच्या वर्तणुकीतून दाखवून दिले. श्रीरामाने राजधर्माचे पालन केले नाही असा चुकीचा संदेश येणाऱ्या पिढीकडे जाता कामा नये यासाठी श्रीरामाने आपल्या सहचारिणीचाही त्याग केला. जनतेच्या पैशांतून आपल्या सात पिढ्या बसून खातील एवढी माया गोळा करणारे हल्लीचे राजकारणी कुठे आणि जनतेच्या मनातील संभ्रम दूर करण्यासाठी प्रसंगी धर्मपत्नीचाही त्याग करणारे प्रभू श्रीराम कुठे. २. शत्रुवरही प्रेम करणारा : रावणाचा वध केल्यानंतर श्रीरामाने रावणाचा बंधू विभीषणाला त्याचा अंत्यसंस्कार करण्यास सांगितले. तेव्हा विभीषणाने त्यास नकार दिला. ममरणांती वैराणीफ या वचनानुसार मृत्यूनंतर वैरही संपते त्यामुळे तू जर रावणाचा अंत्यसंस्कार करायला तयार नसशील तर मी करतो, माझाही तो बंधूच होता असे प्रभू श्रीरामचंद्रानी विभीषणला निक्षून सांगितले. अखेर विभीषण श्रीरामांच्या सांगण्यावरून रावणाचा अंत्यसंस्कार करण्यास तयार झाला. रावण महादेवाचा थोर भक्त होता. भक्तीच्या बळावर त्याने प्रचंड बळ आणि सिद्धी हस्तगत केल्या होत्या ज्याचा त्याला गर्व झाला होता. श्रीरामांनी रावणाचा वध करून केवळ त्याची भूलोकीची यात्रा संपवली नाही, तर त्याचे गर्वहरण करून त्याचा कायमचा उद्धारही केला. ३. आदर्श पुत्र : श्रीराम सर्वार्थाने आदर्श पुत्र होते. प्रभू श्रीरामाच्या राज्याभिषेकाची सिद्धता सुरु असतानाच सावत्र आई कैकयीने जेव्हा श्रीरामांच्या वनवासाच्या हट्ट धरला तेव्हा कोणतेही आढ ेवेढ े न घेता श्रीरामांनी वनवासात जाण्यास तत्परतेने होकार दिला. वल्कले परिधान केली आणि वनवासात जाण्यासाठी सिद्ध झाले. वनवासाहून आल्यानंतर श्रीरामांनी कैकयी मातेचे आशीर्वाद घेतले. कोणताही पूर्वग्रह न बाळगता ते कैकयी मातेशी पूर्वीप्रमाणे प्रेमाने वागू लागले. कुठ े सत्तेच्या हव्यासापोटी आपल्या रक्ताच्या नातेवाईकांशी वैराने वागणारे हल्लीचे राज्यकर्ते आणि कुठे वडिलांनी सावत्र आईला दिलेल्या वचनाच्या पूर्ततेसाठी क्षणार्धात साऱ्या वैभवावर पाणी सोडणारे प्रभू श्रीराम ! ४. आदर्श बंधू : आजही दोन भावांत प्रेमाचे नाते दिसले कि त्यांना आपण राम लक्ष्मणाची जोडी म्हणून संबोधतो. यावरून श्रीराम आणि लक्ष्मण यांमध्ये किती प्रेमाचे नाते होते हे लक्षात येते. वनवास श्रीरामांना देण्यात आला होता मात्र लक्ष्मणाने सारे वैभव सोडून श्रीरामांची साथ दिली. श्रीरामांनीही संपूर्ण वनवासकाळात लक्ष्मणाची सर्वार्थाने काळजी घेतली. बंधू वनवासात गेला असताना अयोध्येचे राज्य उपभोगायची संधी मिळाल्यावरही भरताने श्रीरामाच्या पादुका सिंहासनावर ठेवून विश्वस्त म्हणून राज्याचा कार्यभार सांभाळला. यावरूनच श्रीरामांनी भरताला काय ताकदीचे बंधुप्रेम दिले होते याची कल्पना येते. ज्या काळात रावणाने बंधू विभीषणाला सापत्न वागणूक दिली. वालीने बंधू सुग्रीवावर अन्याय केला होता त्याकाळात आदर्श बंधूप्रेमाचा परिपाठ श्रीरामांनी घालून दिला. वडिलांच्या संपत्तीमध्ये अधिकाधिक वाटा मिळण्यासाठी एकमेकांचा जीव घेण्यास उठणाऱ्या आताच्या बंधू ंनी श्रीराम लक्ष्मणाच्या नात्यातून बोध घ्यायला हवा. ५. संघटन कुशलता : रावणाने सीतेचे हरण केल्यानंतर श्रीविष्णूचा अवतार असलेले श्रीराम रावणाला सहजपणे पराभूत करून सीतेला घेऊन येऊ शकले असते. एका हाताने शिवधनुष्य पेलणाऱ्या श्रीरामाचे सामर्थ्य काय होते याची कल्पना रावणालाही होती. अयोध्येहून सैन्य मागवून रावणावर चाल करूनही श्रीराम जाऊ शकले असते; मात्र त्यांनी तसे न करता वानरसेनेला संघटित करून त्यांची मने जिंकली आणि अ स ु र ी शक्तीविरो ेधात लढण्यासाठी मोठी फौज सिद्ध केली. वालीचा वध करून सुग्रीवाला जवळ केले. यावरून श्रीरामा ंमधील संघटनकौशल्य लक्षात येते. ६. एकपत्नीव्रत : ज्या काळात राजे आणि राजपुत्र अनेक विवाह करत त्या काळातही प्रभू श्रीरामांनी एकपत्नीव्रत आचरले होते. अश्वमेध यज्ञाच्या प्रसंगी पत्नीची आवश्यकता असताना प्रभू श्रीरामांनी दुसरा विवाह न करता सीतामातेची प्रतिकृती बनवून ती पत्नी म्हणून सोबत बसवली. पत्नीप्रती त्यांची निष्ठा या एका उदाहरणावरून लक्षात येते. ७. त्याग आणि साधेपणा : सावत्र माता कैकयीच्या वचनाचा आदर ठेवून त्यांनी एका क्षणात साऱ्या राजसुखाचा त्याग करून वल्कले परिधान केली. वनवासात काट्याकुट्यातून अनवाणी चालले. झोपडीत राहून कंदमुळे खाल्ली, जमिनीवर झोपले. जंगलातील वानरांना आणि अस्वलांना त्यांनी प्रेमाने जवळ केले, शबरीची उष्टी बोरे खाल्ली. यातून श्रीरामांतील त्यागाची आणि साधेपणाची जाणीव प्रकर्षाने होते.

# ७ एप्रिल जागतिक आरोग्य दिन
# निरोगी सुरवात अशादायक भविष्य

जागतिक आरोग्य दिन हा दरवर्षी ७ एप्रिल रोजी साजरा केला जातो. जागतिक आरोग्य जागरुकता दिन आहे जागतिक आरोग्य संघटना (थक्ज) ची स्थापना झाल्यानंतर एक वर्षानंतर १९५० मध्ये पहिल्यांदा जागतिक आरोग्य दिन साजरा करण्यात आला जगभरातील लोकांवर परिणाम करणाऱ्या महत्त्वाच्या आरोग्य समस्यांबद्दल जागरूकता वाढवणे आणि चांगल्या आरोग्य शिक्षणाद्वारे चांगल्या राहणीमानाला प्रोत्साहन देणे हे या दिनाचे उद्दिष्ट होते. गेल्या काही वर्षात, हा दिवस संसर्गजन्य रोगांपासून मानसिक आरोग्य आणि आरोग्यसमानते पर्यतचा विविध मुद्दयांवर केंद्रित आहे आणि तो सरकार, गैर-सरकारी, संस्था आणि व्यक्तिद्वारे समर्थित एक प्रमुख जागतिक कार्यक्रम बनला आहे. जागतिक आरोग्य दिन हा जागतिक लोकसंख्येवर परिणाम करणाऱ्या आरोग्यविषयक समस्यांवर प्रकाश टाकतो. जागतिक आरोग्य दिन २०२५ ची थीम निरोगी सुरुवात, आशादायक भविष्य आहे. जी माता आणि नवजात बालकांच्या आरोग्यावर लक्ष केंद्रित करते. टाळता येण्याजोग्या माता आणि नवजात बालकांच्या बालमृत्यूच्या समस्यांवर लक्ष केंद्रित करणे आणि माता आणि नवजात बालकांचे आरोग्य सुधारणे हा यावर्षीच्या थीमचा मुख्य उद्देश आहे. ही थीम माता आणि नवजात बालकांच्या आरोग्याच्या समस्यांवर जागरुकता वाढवते आणि त्यांच्यासाठी चांगले भविष्य सुनिश्चित करण्यासाठी उपाययोजना करण्यास प्रोत्साहन देते. हे काम अत्यंत महत्वाचे आहे. दुर्देवाने सध्या प्रकाशित झालेल्या अंदाजानुसार गर्भधारण आणि बाळंतपणामूळे आपला जीव गमावणाऱ्या महिलांची संख्या खुप जास्त आहे. तसेच जन्माच्या पहिल्या महिन्यातच अनेक बाळे (२० लाखांहून अधिक) मरतात आणि यापेक्षा अधिक बाळे मृत जन्माला येतात. सर्वत्र महिला आणि कुटुंबाना उच्च दर्जाच्या काळजीची आवश्यकता असते जी त्यांना जन्मापूर्वी, दरम्यान आणि नंतर शारीरिक आणि भावनिक दृष्ट्या आधार देते. माता आणि नवजात बाळाच्या आरोग्यावर परिणाम करणाऱ्या अनेक आरोग्य समस्यांचे व्यवस्थापन करण्यासाठी आरोग्य व्यवस्था विकसित झाल्या पाहिजेत. यामध्ये थेट प्रसूती गु ंतागु ंतच नाहीं तर मानसिक आरोग्य स्थिती, असंसर्गजन्य रोग आणि कुटुंब नियोजन यांचाही समावेश आहे. आरोग्य दिनानिमित्त माता व बाळाच्या निरोगी



**डॉ.संध्या आयस्कर**
प्रभारी प्राचार्य महिला कला महाविद्यालय, बीड

आरोग्यासाठी ही जी मोहिम राबविण्यत येत आहे या मोहिमेचे मुख्य उद्देश- महिला आणि बाळांचे आरोग्य सुधारण्यासाठी प्रभावी तफावती बद्दल जागरूकता निर्माण करणे माता आणि नवजात बालकांच्या जगण्यातीआणि महिलांच्या दीर्घकालीन कल्याणाला प्राधान्य देण्याबाबत प्रोत्साहित करणे. गंभीर काळजी घेणाऱ्या पालकांना तसेच आरोग्य व्यावसायिकांना पाठिंबा देण्यासाठी सामूहिक कृतीला प्रोत्साहन देणे. गर्भधारणा, बाळंतपण आणि प्रसुतीनंतरच्या कालावधीशी संबंधित उपयुक्त माहिती प्रदान करणे. गर्भवती माता आणि नवजात बालकांचे आरोग्य अत्यंत महत्वाचे आहे. कारण ते केवळ त्यांच्या जीवनावरच नाही तर त्यांच्या भविष्यावरही परिणाम करतात. माता आणि नवजात बालकांच्या आरोग्यासाठी योग्य काळजी घेतल्यास, त्यांच्यात निरोगी जीवन जगण्याची क्षमता वाढते. गर्भवती माता आणि नवजात बालकांच्या आरोग्याच्या दृष्टिने महत्त्वाचे मुद्दे जसे की,गर्भधारने दरम्यानची काळजी नियमित आरोग्य तपासणी, पोषक आहार, शारीरिक हालचाली, तणाव टाळणे. प्रसूतीनंतरची काळजी स्तनपान, लसीकरण, आरोग्य तपासणी. नवजात बालकांचे आरोग्य- पोषण, स्वच्छता, रोगप्रतिकारशक्ती लसीकरण. माता आणि नवजात बालकांच्या मानसिक आरोग्याची काळजी- तणाव टाळणे, सामाजिक समर्थन आणि तज्ञांची मदत घेणे. या सर्व बाबींची काळजी घेतल्यस निश्चितच निरोगी सुरूवात होईल आणि आशादायी भविष्य राहिल यात काही शंका नाही. चला तर मग या मोहिमेत सहभागी होवू या. मोहिमेला पाठिंबा देवून याबाबत जागरूकता पसरवूया, माता आणि मृत्यूदर कमी करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करूया.

# अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना इंग्रजी माध्यमाच्या निवासी शाळेत प्रवेश

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट
नांदेड : अनुसुचित जमातीच्या (आदिवासी) विद्यार्थांना इंग्रजी माध्यमाच्या निवासी शाळांमध्ये सन 2025-2026 या वर्षात इयत्ता पहिली व दुसरी मध्ये प्रवेश देण्यासाठी अर्ज करण्याचा कालावधी 20 एप्रिल ते 10 मे 2025 पर्यंत राहिल. त्यानंतर येणाऱ्या अर्जाचा विचार केला जाणार नाही. अटीची पुर्तता करत असलेल्या पालकांनी अर्ज सादर करावेत, असे आवाहन एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प किनवटचे प्रकल्प अधिकारी तथा सहाय्यक जिह्लाधिकारी जेनित चन्द्रा दोन्तुला यांनी केले आहे. प्रकल्प अधिकारी तथा सहायक जिह्लाधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प किनवट जिह्ला नांदेड कार्यक्षेत्रातील अनुसुचित जमातीच्या (आदिवासी) विद्यार्थ्यांना इंग्रजी माध्यमांच्या नामांकित निवासी शाळेत सन 2025-26 मध्ये इयत्ता पहिली व दुसरीमध्ये प्रवेश देण्यासाठी इच्छुक पालकांकडुन इंग्रजी माध्यम नामांकित निवासी शाळेत प्रवेश इयत्ता पहिली व दुसरीसाठी दिनांक 20 एप्रिल 2025 पासुन विद्यार्थ्यांचे अर्ज प्रकल्प कार्यालय किनवट (माहिती सेतु सुविधा केंद्र) व या कार्यालयातंर्गत असलेल्या सर्व शासकीय आश्रमशाळांवर विनामुल्य उपलब्ध आहेत. येथुन अर्ज प्राप्त करुन घ्यावे. अर्जासोबत पुढील कागदपत्राच्या अटी व शर्ती पुर्ण करुन परिपूर्ण अर्जच सादर करावेत. तसेच वरीष्ठ कार्यालयाकडुन मंजुरी दिलेल्या शाळांना व मंजुर संख्येनुसारच विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात येईल. अर्जासोबत पुढील कागदपत्राच्या अटी व शर्ती पूर्ण करुन परिपूर्ण अर्ज सादर करावेत. सदर योजनेचा लाभ घेवू इच्छिणारा विद्यार्थी अनुसूचित जमातीच्या असावा. विद्यार्थ्याच्या पालकाचे/विद्यार्थ्याचे नावे सक्षम अधिकाऱ्याने दिलेल्या अनुसूचित जमातीच्या सांक्षांकित दाखल्याची प्रत जोडणे आवश्यक आहे. प्रवेश अर्जासोबत विद्यार्थ्यांचे जन्मतारखेचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे. जर विद्यार्थी दारिद्ररेषेखालील असेल तर यादीतील अनु.क्रमांकासह मुळप्रमाणपत्राचे प्रत सादर करणे आवश्यक आहे. अन्यथा दारिद्र रेषेसाठी विचार केला जाणार नाही. या योजनेचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्याच्या पालकाचे कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न 1 लक्ष इतके राहील. (तहसिलदार यांचे चालु वर्षाचे उत्पन्न प्रमाणपत्र सोबत जोडावे). इयत्ता 1 ली मध्ये प्रवेश घेवु इच्छिणाऱ्या विद्यार्थ्याचे वय 6 वर्ष पुर्ण असावे. पालकाचे संमतीपत्र व विद्यार्थ्याचे दोन पासपोर्ट फोटो व जन्मतारखेचा दाखला (अंगणवाडी, ग्रामसेवक) यांच्या शिक्का व स्वाक्षरीसह जोडावा. विद्यार्थ्याचे वैद्यकीय पात्रता प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे. आदिम जमातीच्या विद्यार्थ्याची तसेच विधवा, घटस्फोट, निराधार, परितक्त्या व दारिद्र रेषेखालील अनुसूचित जमातीच्या पालकाचे विद्यार्थ्यांना प्राधान्याने प्रवेश दिले जाईल. घटस्फोटीत यांनी कार्यालयीन निवाडयाची प्रत सोबत जोडावी. विद्यार्थ्यांचे पालक शासकीय व निमशासकीय नोकरदार नसावेत. (नोकरदार नसल्याचे पालकांनी लेखी लिहुन द्यावी लागेल.) विद्यार्थ्याना वर्ग दुसरी प्रवेशासाठी शिक्षण घेत असलेल्या शाळेचे बोनाफाईड प्रमाणपत्र सादर करावे. या योजनेचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्याचे आधार कार्ड जोडणे आवश्यक आहे. अर्ज सादर करावयाचा दिनांक 20 एप्रिल 2025 ते अर्ज स्विकारण्याचा शेवट दिनांक 10 मे 2025 पर्यतच राहील त्यानंतर येणाऱ्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.

आवश्यक कागदपत्रे:-
अर्जदार विद्यार्थ्याचे नजिकच्या काळातील दोन पासपोर्ट साईज फोटो. पालकाचे रहिवासी प्रमाणपत्र. पालकाचे जातीचे प्रमाणपत्र. उत्पन्नाचा दाखला. अंगणवाडीचा दाखला (पहिली इयत्तेसाठी) / ग्रामसेवकाचा दाखला. इयत्ता दुसरी प्रवेशासाठी बोनाफाईड दाखला जोडणे आवश्यक आहे. विद्यार्थ्याचा आधारकार्ड. विद्यार्थ्याचे वैद्यकीय प्रमाणपत्र दारिद्ररेषेखालील असल्यासबाबतचा दाखला/ग्रामसेवक दाखला. महिला पालक विधवा/घटस्फोटीत/निराधार/परितक्त्या असल्यास ग्रामपंचायतीचा दाखला. ज्या शाळेमध्ये विद्यार्थ्याला प्रवेश मिळाले आहे त्याच शाळेमध्ये इयत्ता पहिली ते बारावी पर्यत शिक्षण घेत असल्याबाबत हमीपत्र. याप्रमाणे प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प किनवट जिह्ला नांदेड या कार्यालयात व या कार्यालयातंर्गत असलेल्या सर्व शासकीय कार्यालयास अचुक माहिती भरुन अर्ज दिनांक 10 मे 2025 पर्यंत या कार्यालयात (माहिती सेतु सुविधा केंद्र) येथे सादर करण्यात यावे. या निकषामध्ये बसणाऱ्या अनुसुचित जमातीच्या विद्यार्थ्याना इंग्रजी माध्यमांच्या नामांकित निवासी शाळांमध्ये शिक्षण घेण्याकरिता या कार्यालयाकडुन अर्ज मागवुन विद्यार्थ्यांची निवड करुन, वरीष्ठ कार्यालयाकडुन प्रवेश देण्याबाबत शाळा नावाचे यादीसह आदेश प्राप्त होताच नामांकित निवासी शाळेत विद्यार्थ्याना प्रवेश देण्यात येईल, असेही प्रसिद्धी पत्रकाद्वारे एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प किनवटचे प्रकल्प अधिकारी तथा सहाय्यक जिह्लाधिकारी जेनित चन्द्रा दोन्तुला यांनी कळविले आहे.

# लिंबागणेश येथे जगाला एकात्मतेची शिकवण देणारे संत कैकाडी महाराज यांची जयंती व रामनवमी उत्साहात साजरी

लिंबागणेश:- ( दि.०६) मानवानो माणुसकीला जागा हा महामंत्र देणारे राष्ट्रसंत,महान तपस्वी संत राजाराम महाराज म्हणजेच कैकाडी महाराज यांची जयंती आणि रामनवमी आज दि.०६ रविवार रोजी बीड तालुक्यातील लिंबागणेश येथील ग्रामपंचायत कार्यालयात प्रभु रामचंद्र आणि कैकाडी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून श्रीफळ फोडून मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी सरपंच बालासाहेब जाधव होते. कार्यक्रमाचे प्रस्तावित रमेश गायकवाड यांनी केले तर सुत्रसंचलन हरिओम क्षीरसागर यांनी केले. डॉ.गणेश ढवळे यांनी आभार मानले.


संत कैकाडी महाराज यांच्या जीवनकार्याची महती वर्णन करताना प्रा .लेनाजी गायकवाड यांनी “ संत कैकाडी कैकाडी ! “दरारा आसमंती!! कुळ -विठुचे लावुन! खनिल्या विषमतेच्या भिंती!!

कीर्तने ,प्रवचने, अंधश्रद्धा निर्मूलन, बालविवाह प्रतिबंध, अस्पृश्यता निर्मूलन याद्वारे समाज प्रबोधन करून सर्व जगाला एकात्मतेची शिकवण देणारे महान तपस्वी कैकाडी महाराज यांचा जन्म राम नवमीला इ.स.१९०७ मध्ये अहिल्यानगर जिल्ह्यातील श्रीगोंदा तालुक्यातील मांडवगण या गावी झाला. राष्ट्रसंत श्री कैकाडी महाराजांनी आपल्या कारकिर्दीत कोणाकडूनही पैसे घेतले नाहीत. तसेच ते कपडेही फार कमी वापरायचे.



साधी राहणे व कधीही अन्न वाया जाऊ देत नसत. तसेच कोणालाही पाया पडू देत नसत “ तुम्ही देव होऊ नका ,संत होऊ नका, तुम्ही फक्त माणस व्हा माणसं “ हा संदेश ते समाजाला देत होते. “हे विश्वचि माझे घर “अशी भावना निर्माण झाल्याने त्यांनी समाज परिवर्तनासाठी स्वतःचा देह झिजवला. त्यांनी संपूर्ण भारतभ्रमण केले त्यामुळे त्यांना कन्नड, तेलगू अशा भाषा येत होत्या. त्यांनी महाराष्ट्रासह अनेक प्रांतामध्ये जाऊन समाज प्रबोधन केले.पंढरपूर येथे मंदिर बांधण्यासाठी भाविकांकडून त्यांनी सहस्त्रकोटी नाम जप करून घेतला. कैकाडी मठ हे पंढरपूरचे आकर्षण आहे. भारताच्या ऐतिहासिक आणि प्राचीन काळामधील या मठात भारत माता मंदिर आहे. या मंदिरामध्ये स्वर्गलोक ,पृथ्वीलोक आणि पातळ अशी या मठाची निर्मिती करण्यात आलेली आहे. माशाच्या तोंडाच्या तोंडासारखा मठाच्या प्रवेशद्वाराचा आकार तयार करण्यात आलेला आहे. विविध देवदैवतांच्या,संतांच्या, महापुरुषांच्या ,क्रांतिकारकांच्या मुर्त्या या ठिकाणी बसविण्यात आले आहेत.मठाचे सविस्तर वर्णन सांगितले. ह.भ.प.अनंतकाका मुळे यांनी मर्यादा पुरुषोत्तम प्रभु रामचंद्र यांच्या जीवनावर आधारित प्रवचन केले. यावेळी राजेभाऊ गिरे, ग्रामपंचायत सदस्य दामोदर थोरात, महादेव कुदळे, बाळकृष्ण थोरात,दादा गायकवाड, तुकाराम गायकवाड, संजय घोलप , अँड गणेश वाणी, संतोष भोसले, अंकुश गायकवाड, रामदास मुळे, श्रीराम वायभट, सुरेश ढवळे, सुरेश निर्मळ आदी ग्रामस्थ उपस्थित होते.

# ट्रॅक्टर चालकाने ऊसतोड मजूर महिलेचे केले लैंगिक शोषण.



केज : पतीपासून विभक्त राहणाऱ्या ऊसतोड ऊसतोड मजूर महिलेचे ट्रॅक्टर चालकाने लैंगिक शोषण करीत फसवणूक केल्याप्रकरणी केज पोलिसात गुन्हा दाखल झाला आहे. तर ट्रॅक्टर चालक तरुण विवाहित असून त्या दोघांना प्रत्येकी दोन मुले आहेत. ही पीडित महिला धारूर तालुक्यातील असून ती तिच्या पतीपासून विभक्त राहते. तिला दोन मुले असून ती ऊसतोडणीचे काम करून कुटुंबाचा उदरनिर्वाह चालविते. ऊसतोडणीसाठी गेली असता तिची ओळख ऊस वाहतूक करणाऱ्या ट्रॅक्टर चालक गोविंद जाधव याच्याशी झाली. ऊसतोडणीचे काम संपल्यानंतर ते दोघे केज येथे किरायाने घर करून पती-पत्नीप्रमाणे एकत्र राहत होते. त्या तरुणाचे देखील लग्न झालेले असून त्यालाही दोन मुले आहेत. मात्र प्रेमात आंधळा झालेल्या या ट्रॅक्टर चालक तरुणाने तिची फसवून करीत तिच्यासोबत शारीरिक सबंध प्रस्थापित केले. तिचे लैंगिक शोषण केले. हा प्रकार कोणाला सांगितल्यास जिवे मारण्याची धमकी दिली. अशी तक्रार पीडित महिलेने दिल्यावरून गोविंद जाधव विरुद्ध केज पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास पिंक पथकाचे फौजदार प्रकाश शेळके हे करीत आहेत.

दैनिक **लोकआरंभ** लोकक्रांतीचा आरंभ

संपादकःराहुल मारोतीराव वाईकर

सोमवार ७ एप्रिल २०२५

https://lokaarambh.com




# अर्धमसला मस्जिद बॉम्ब बलास्ट प्रकरणी आरोपींवर यु.ए.पी.ए अंतर्गत गुन्हा दाखल

बीड : गेवराई तालुक्यातील अर्धमसला गावात दि.३० रोजी पहाटे २.३० च्या दरम्यान गावातील दोन युवकांनी अर्धमसला गावातील मस्जिदमध्ये एक खड्डा खोदून जिलेटिनच्या कांड्या पेरल्या होत्या. त्यानंतर २०० फूट अंतरावर जाऊन मारुती मंदिराच्या समोरून रिमोटद्वारे स्फोट घडवून आणला होता. स्फोट घडवून आणल्यानंतर प्रार्थनास्थळाच्या भिंतीला तडे गेले होते. तसेच काही भागाचे मोठे नुकसान झाले होते. या स्फोटाची माहिती पोलिसांना मिळताच, त्यांनी घटनास्थळी धाव घेतली होती. या घटनेने बीड जिल्ह्यात खळबळ उडाली होती. पोलिस अधीक्षक नवनीत कावत यांनी घटनेचे गांभीर्य लक्षात घेत अर्धमसला गावातील प्रार्थनास्थळाला भेट दिली होती. त्यांच्यापाठोपाठ औरंगाबाद परिक्षेत्राचे विशेष पोलिस महानिरीक्षक वीरेंद्र मिश्रा यांनी देखील घटनास्थळाची पाहणी केली होती. याप्रकरणी दोन आतंकवादी विरुद्ध तलवाडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. विजय रामा गव्हाणे, श्रीराम अशोक सागडे (दोघे रा. अर्धमसला) असे अटक केलेल्या दोन आतंकवादी चे नावे आहेत. या घटनेनंतर बीड जिल्ह्यात या घटनेचा निषेध करण्यात येत होता. या घटनेचे आरोपी विरोधात यूएपीए अंतर्गत गुन्हे दाखल करण्यात यावे यासाठी बीड जिल्ह्यातील मुस्लिम समाजाकडून जागोजागी धरणे आंदोलन मोर्चे व जिल्हाधिकारी जिल्ह्यातील तहसीलदार यांना निवेदन देण्यात आले होते. प्रशासनाने या घटनेची गंभीर दखल घेत आरोपीं विरुद्ध यूएपीए हा दहशतवादविरोधी कायदा लावण्यात आला आहे. आता यूएपीए लागू झाल्यामुळे हा तपास डीवायएसपी दर्जाच्या अधिकाऱ्यांकडे जाणार आहे. दरम्यान, दोन्ही आरोपींना शनिवारी न्यायालयासमोर हजर केले असता विशेषसत्र न्यायाधीश व्यंकटेश पाटवदकर





यांनी ९ एप्रिलपर्यंत पोलिस कोठडी सुनावली. दोन्ही आरोपींची तलवाडा पोलिसठाण्याच्या कोठडीत रवानगी केली आहे. या गुन्ह्याचा तपास आता स्थानिक गुन्हा शाखेकडून गेवराई पोलिस उपअधीक्षकांकडे वर्ग करण्यात आला आहे. मशिदीमधील स्फोटाचे हे कृत्य दहशतवादी असून या घटने मुळे सर्वसामान्य जनतेत भीती निर्माण झाली होती. अशा दहशतवादी कृत्यास प्रतिबंधक करण्यासाठी भारतीय न्याय संहितेचे कलम ११३ व बेकायदेशीर कृत्य प्रतिबंधक अधिनियम (यूएपीए) १९६७चे कलम १५,१६,१८ अन्वये अशी दोन कलमे या गुन्ह्यात वाढवण्यात आले. बीडच्या इतिहासात पहिल्यांदाच यूएपीए हा दहशतवादविरोधी कायदा एखाद्या गुन्ह्यात लागू झाला आहे. अशी माहिती बीडच्या स्थानिक गुन्हा शाखेचे पोलिस निरीक्षक उस्मान शेख यांनी दिल

# अकार्यक्षम आमदाराकडुन खासबाग पुलाचे अपयश झाकण्याचा केविलवाणा प्रयत्न - अशपाक इनामदार

बीड-( प्रतीनिधी लोक इच्छा न्युज) बीड शहर हे बीड विधानसभा मतदारसंघातील सर्वात मोठ्या लोकसंख्येचे ठिकाण असल्याने शहरातील जनता गेल्या अनेक दिवसांपासून बिंदुसरा नदीवर मध्यभागी पुल नसल्याने व शहराच्या दोन विभागातील नागरिकांना जाण्या येण्यासाठी त्रास सहन करावा लागत आहे. निवडणुकीच्या काळात व अनेकदा जनते समोर ठोस आश्वासन देऊन खासबाग पुलाला अर्थिक तरतूद देखील झाली आहे अशी खोटी पत्रक बाजी करून प्रसिद्धी मिळवणारे अकार्यक्षम आमदार संदीप क्षीरसागर हे आपल्या सत्तेत असताना आलेल्या अपयशाला झाकण्यासाठी केविलवाणा प्रयत्न करीत आहेत असा आरोप माजी सभापती व राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार यांच्या गटाचे नेते अशपाक इनामदार यांनी ऐका प्रसिद्धीपत्रकाद्वारे केला आहे.



पत्रात पुढे म्हटले आहे की देशाला स्वातंत्र्य मिळवून ७८ वर्षात दिर्घकाळ सत्ताधारी राहिलेल्या कुटुंबातील सदस्य व गेल्या पंचवार्षिक सत्तेत तिन वर्षे आमदार राहिलेल्या व राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांचे लाडके म्हणून मिरवले जाणारे बीडचे आम दारांना साधा खासबाग या अतिशय महत्वाचा पुल करता आला नाही. मात्र आयत्यापिठावर रेगुट्या मारुन श्रेय घेऊन आपल्या निष्क्रियपणा झाकुन तो मीच मंजूर करून घेतला अशा थाटात उद्घाटन करीत आहे .आज दिवंगत माजी आमदार विनायक मेटे हयात असते तर यांची अशी हिम्मत झाली असती का असा सवाल पत्रकत करण्यात आला आहे.

पत्रकात शेवटी म्हटले आहे की या आमदार महोदयांनी तत्कालीन जलसंपदा मंत्री जयंत पाटील यांना भेटून फोटो काढून बीड शहरातील खासबाग येथे पूल कम बंधारा मंजूर करण्यात आला आहे व यासाठी अर्थिक तरतूद देखील करण्यात आली आहे असे भासवून शासकीय यंत्रणेनेला बोलावून सर्व्हे करण्याचे नाटक केले सोबत दुर्बीण देखील घेऊन खासबाग येथे जनतेच्या उपस्थिती सत्कार करुन घेतला त्याचे फोटो काढून वृत्तपत्रात छापून आणले. गेल्या सहा वर्षांपासून या आमदार महोदयांनी शहरात एकही ठोस काम केलेली नाही. आपला अकार्यक्षम व निष्क्रियपणा झाकण्यासाठी दिवंगत मेटे साहेबांनी केंद्रीय मंत्री गडकरी साहेबांकडून मंजूर करून आणलेला बार्शी नाक्यावरील पुलकम बंधारा हा मीच मंजूर करून आणला असल्याचा केविलवाणा प्रयत्न संदीप क्षीरसागर करत आहेत. शेवटी जनता हुशार आहे . अशा भुलथापांना व दिशाभूल करणार्या आमदारांना येणाऱ्या निवडणुकीत धडा शिकवल्या शिवाय राहणार नाही असा इशारा पत्रात शेवटी अशपाक इनामदार यांनी दिला आहे.

# कुलर वापरताना विधुत सुरक्षेची घ्या काळजी-महावितरणाचे आवाहन

पिंपळनेर-प्रतिनिधी तापमान वाढल्याने कुलरचा वापर मोठ्या प्रमाणावर सुरू झाला आहे. मात्र खबरदारी न घेतल्याने अपघाताची शक्यता असते. त्यासाठी नागरिकांनी कुलर वापरताना विद्युत सुरक्षेची खबरदारी घ्यावी, असे आवाहन पिंपळनेरच्या विद्युत महावितरणने केले आहे. कुलरसाठी नेहमी थ्रीपिन प्लगचा वापर करावा. कुलरमध्ये पाणी भरण्यापूर्वी कुलरचा वीजपुरवठा बंद करून प्लग काढून ठेवावा म्हणजे कुलरचा विजेशी काहीही संबंध राहणार नाही. पाणी भरल्यानंतर प्लग पिन लावून स्विच चालू करावे. त्यानंतर कुलरच्या कुठल्याही भागाला स्पर्श करू नये. कुलरचे कनेक्शन व वायरिंग अधिकृत कारागिराकडून तपासून घ्यावे. अर्थिंगची तपासणी करून घ्यावी. अर्थिंग व्यवस्थित असल्यास लिकेज करंट येत नाही. लहान मुलांना नेहमी कुलरपासून सुरक्षित अंतरावर ठेवावे आणि ती कुलरजवळ खेळणार नाहीत, याबाबत दक्षता घ्यावी. कुलरच्या लोखंडी बाह्यभागात वीजप्रवाह उतरू नये यासाठी कुलरचा थेट जमिनीशी संपर्क येईल, अशी व्यवस्था करावी; जेणेकरून कुलरच्या लोखंडी बाह्यभागात वीजप्रवाह उतरल्यास त्याचा धक्का बसणार नाही. पाण्याचा पंप ५ मिनिटे सुरू आणि १० मिनिटे बंद ठेवणाऱ्या इलेक्ट्रिक सर्किटचा वापर करावा. यामुळे विजेचीही बचत शक्य आहे. कुलरच्या प्लगला जोडलेली वायर खंडित वा जीर्ण झालेली असल्यास बदलून दुसरी लावण्यात यावी. अनेकदा पाण्याची पातळी खोल गेल्याने पंप सुरू करूनही पाणी खेचले जात नाही आदी आवाहन महावितरणने केले आहे.

# श्री गजानन बँकेला एक कोटी तीस लाखाचा नफा

बीड-प्रतिनिधी सर्वांना आपलं मानणारी आपली बँक या दृढ विश्वासाने २०८ कोटी ३५ लाख ४५ हजार व्यवसाय असलेल्या श्री गजानन नागरी सहकारी बँकेला मार्च २०२५ अखेर नेट नफा एक कोटी तीस लाख ७४ हजाराचा झाला आहे. अशी माहिती बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी एम. आर. क्षीरसागर व सरव्यवस्थापक डॉ.शेख एम. एस. यांनी दिली आहे. बँकेचे अध्यक्ष तथा माजी मंत्री जयदत्त सोनाजीराव क्षीरसागर यांचे नियोजनबद्ध निर्णय व अभ्यासू मार्गदर्शन लाभले आहे तसेच बँकेचे उपाध्यक्ष जगदीश काळे व संचालक मंडळाचे मोलाचे मार्गदर्शन लाभले आहे. बँकेची ३१ मार्च २०२५ वरील वित्तीय स्थितीमध्ये बँकेचे भाग भांडवल पाच कोटी दहा लाख ६६ हजार, राखीव व इतर निधी १८ कोटी १९ लाख ६६ हजार, नेटवर्थ १९ कोटी ६० लाख ५६ हजार, ठेवी १२७ कोटी ५५ लाख ४० हजार, कर्जे ८० कोटी ८८ लाख पाच हजार, गुंतवणूक ४६ कोटी ४८ लाख ६१ हजार, सीडी रेशो ६३.४१ %, ग्रॉस एनपीए ३.०५%, नेट एनपीए ० %, भांडवल प्राप्त रेशो २६.५२% आहे. बँक रिझर्व बँकेचे सर्व नॉर्म्स पूर्ण करत आहे. बँकेचे अध्यक्ष माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर व उपाध्यक्ष जगदीश काळे व संचालक मंडळ यांनी स्थितीबाबत समाधान व्यक्त करून मुख्य कार्यकारी अधिकारी एम. आर. क्षीरसागर, सरव्यवस्थापक डॉ.एम. एस. शेख, व्यवस्थापक विलास कुंबेफळकर, वसुली अधिकारी लांडे के. ए. व कर्मचारी वर्ग यांनी ठेवीचे व कर्जाचे दिलेले टारगेट पूर्ण केल्यामुळे कौतुक केले आहे.

# श्री क्षेत्र भगवानगडाच्या नारळी सप्ताहामध्ये भाविकांना ज्ञानदानासोबतच दररोज मिळणार विशेष पदार्थांची मेजवानी

श्री संत भगवानबाबांनी प्रारंभ केलेल्या नारळी सप्ताहाच्या ९१ व्या वर्षांचे यजमानपदाचे शिवधनुष्य हे पिंपळनेर (ता. शिरूर, जि. बीड) ग्रामस्थांनी उचलले आहे. श्री क्षेत्र भगवानगडाचे मठाधिपती. ह.भ.प.महंत श्रीगुरु न्यायाचार्य डॉ. श्री. नामदेव महाराज शास्त्री बाबा यांच्या मार्गदर्शनाखाली सप्ताहाची तयारी अंतिम टप्यात आली असुन मंडप उभारणीचे काम वेगाने सुरू आहे. श्री संत भगवानबाबांनी फिरता नारळी सप्ताहाचा नाविन्यपुर्ण उपक्रम ९१ वर्षांपूर्वी श्री क्षेत्र नारायणगडाच्या पायथ्याशी असल्या पालडोह या ठिकाणी सुरू केला. त्यांचे पश्चात तीच सप्ताहाची



परंपरा श्री क्षेत्र भगवानगडाचे द्वितीय उत्तराधिकारी वै.ह. भ. प. गुरुवर्य श्री संत भिमसिह महाराज यांनी सुरू ठेऊन बाबांचे कार्य सुरू ठेवले होते, वै. गुरुवर्य भीमसिंह महाराजांच्या वैकुंठगमनानंतर श्री क्षेत्र भगवानगडाचे विद्यमान मठाधिपती ह.भ.प. महंत श्रीगुरु न्यायाचार्य डॉ. नामदेव महाराज शास्त्री बाबा यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली या सप्ताहाची एक वेगळी ओळख निर्माण झाली आहे. हा नारळी सप्ताह वैभवशाली असल्याने संपूर्ण महाराष्ट्र ातून लाखो भाविक सप्ताहामध्ये आठवडाभर उपस्थित असतात. नारळाचे यजमानपद स्विकारलेले ग्रामस्थ आठवडाभर तन, मन आणि धन खर्ची घालत श्रीगुरूंची सेवा करत असतात. १० ते १७ एप्रिल हा या महोत्सवाचा कालावधी असून सप्ताहामध्ये दररोज ठीक ३:३० ते ६. या वेळेमध्ये ह.भ.प.श्री. प्रकाश महाराज साठे यांची श्रीमद् भागवत कथा संपन्न होणार आहे. सप्ताहामध्ये अनुक्रमे ह.भ.प. महंत श्री. कृष्णा महाराज शास्त्री (उत्तराधिकारी भगवानगड), ह.भ.प प्रभाकर महाराज बोधले (पंढरपूर), ह.भ.प. सोपान महाराज शास्त्री (भागवताचार्य), ह.भ.प.निवृत्ती महाराज देशमुख इंदोरीकर (समाज प्रबोधनकार), ह.भ.प. अमृत महाराज जोशी (महामंडलेश्वर), ह.भ.प.श्री. ज्ञानेश्वर महाराज जळकीकर (जळगांवकर) यांच्या कीर्तन सेवा होणार असून साप्ताहाच्या सातव्या दिवशी रात्री ठीक ८:३० ते ११ या वेळेत श्री क्षेत्र भगवानगडाचे मठाधिपती, ह.भ.प. महंत श्रीगुरु न्यायाचार्य डॉ. श्री. नामदेव महाराज शास्त्री बाबा यांचे जागराचे जाहीर हरीकीर्तन होणार आहे. त्यानंतर काल्याच्या दिवशी श्री क्षेत्र भगवानगडाचे मठाधिपती ह.भ.प. महंत श्रीगुरु न्यायाचार्य डॉ. श्री. नामदेव महाराज शास्त्री बाबा यांचे अमृततुल्य काल्याचे कीर्तन होईल. त्यानंतर महाप्रसादाने सप्ताहाची सांगता होईल, सप्ताहामध्ये परंपरेप्रमाणे दररोज पहाटे काकडा भजन, ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण

# सामाजिक एकोपा जोपासण्यासाठी रिपाइंचा ईद ए-मिलाफ

बीड/प्रतिनिधी

हिंदू-मुस्लिमांच्या ऐक्याचे प्रतिक असलेल्या पवित्र रमजान ईदचे औचित्य साधून हिंदू-मुस्लिम भाईचारा वाढविण्यासाठी युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष पप्पू कागदे यांच्या वतीने दरवर्षीप्रमाणे याही वर्षी हिंदू-मुस्लिम समाज बांधवांना ईदच्या शुभेच्छा देण्यासाठी व सामाजिक एकोपा जोपासण्यासाठी बीड शहर रिपाइंच्या वतीने बशीरगंज चौक बीड येथे रविवार (दि.6) एप्रिल 2025 रोजी हजारो हिंदू-मुस्लिम बांधवांच्या उपस्थितीत ईद ए-मिलाफ कार्यक्रम संपन्न झाला. भारताची एकात्मता व देशातील सर्व धर्मीय भाईचारा व बंधुता टिकून ठेवण्यासाठी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी समता, स्वातंत्र्य व बंधुताचा संदेश देत भारत एक संघ ठेवण्याचे महान कार्य केले. सामाजिक एकोपा जोपासण्यासाठी व हिंदू-मुस्लिम भाईचारा वाढविण्यासाठी गेल्या चौदा वर्षापासून रिपाइंच्या वतीने केले जात आहे. आगामी काळातही समता, स्वातंत्र्य,बंधुता व एकोपा जोपासण्यासाठी सर्व धर्मीयांना सोबत घेऊन ईद ए-मिलाफच्या माध्यमातून सुरू राहणार आहे. रिपाइंच्या वतीने युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष पप्पू कागदे यांनी आयोजित केलेल्या ईद-ए-मिलाफच्या कार्यक्रमास माजी आ.राजेंद्र जगतप, जनार्धन तुपे, मोईन मास्तर, सय्यद सलीम,आ. विजयसिंह पंडित, डॉ.योगेश क्षीरसागर, सुशीलाताई मोराळे, तय्यबभाई, जावेद कुरेशी, फारूक पटेल, ऍड.बाळासाहेब राख, उल्हास गिराम, बीड तहसीलदार चंद्रकांत शेळके, पोलीस उपविभागीय अधिकारी विश्वंभर गोल्डे, अशोक लोढा, अमृत सारडा, नवनाथ शिराळे, शेख शफिक भाऊ, चंद्रकांत नवले, अशोक हिंगे, रंजित क्षीरसागर, शेख इकबाल, जलील पठाण,ॲड.सय्यद यासेर पटेल,बबन वडमारे, गोपाळ धांडे, विष्णू वाघमारे, सुहास पाटील, डॉ.सतिष साळुंके, डॉ.लक्ष्मण जाधव, ॲड.सुभाष राऊत, सुनिल क्षीरसागर, वैभव स्वामी, दिनेश लिंबेकर, जयतुला खान, सादेक जमा, गणेश वाघमारे,किशोर कांडेकर, अविनाश जावळे, अशोक साळवे, अरुण निकाळजे, सादेक कुरेशी, लक्ष्मण सिरसट, धोंडीराम सिरसट,दीपक कांबळे, दशरथ सोनवणे, प्रमोद दासूद, गौतम बचुटे, संदीपान डोंगरे, बापू पवार, शाहू डोळस, गोवर्धन वाघमारे, महेश आठवले, मायाताई मिसळे, रेश्माताई जोगदंड, अरुणाताई आठवले, नाना मस्के, अविनाश जोगदंड, भैय्यासाहेब मस्के, सुभाष तांगडे, प्रभाकर चांदणे, सतिष शिनगारे, धम्मा पारवेकर, नामदेव वाघमारे, शाम वीर, भैय्यासाहेब साळवे,अक्षय कोकाटे, भाऊसाहेब दळवी, ॲड.श्रीकांत साबळे, महेंद्र वडमारे, सचिन वडमारे, यांच्यासह विविध पक्षाचे पदाधिकारी उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी राजू जोगदंड, मझरखान, रमेश गंगाधरे, सय्यद जफर, सादेक पठाण किसन तांगडे, रफिक भाई फिटर, शेख रोहिल रफीख, सुलतान बाबा, सिद्धीक फारुखी, फरहान बागवान, रणजीत शिनगारे आदींनी परिश्रम घेतले.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ॲड.सुरेश वडमारे यांनी केले.






This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com